म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना.वा.
दा. क्र. ६६८५४

२

# श्री गुरुदेव दत्त



विजय प्रकाशन मुंबई १२

# त्रिगुणात्मक, त्रैमूर्ति, त्रैलोक्यराज

# श्री गुरुदेव दत्त

[ अवतार, कार्य, उपदेश, उपासना इ. ]



अनुक्रम 30838
विभाग
क्रमांक 2408
नों. दि.

तीन शिरें सहा हात ।
तया माझा दंडवत ॥

—श्री तुकाराम महाराज

संपादक:—
अनंत वासुदेव मराठे

मूल्य ४० नये पैसे

विजय प्रकाशन, मुंबई १२

मुद्रक :

र. अ. मोरमकर

लक्ष्मी नारायण प्रेस, ठाकुरद्वार,

मुंबई २.

आवृत्ति पहिली

( दत्तजयंति शके १८८० )

२५ डिसेंबर सन १९५८

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रकाशक :

रा. सा. सारंग

बी. आय. टी. ब्लाक. नं. ६,

परळ, मुंबई १२.

# श्रीगुरुदेव दत्त

## विषय

प्रास्ताविक

१ अत्रि आणि अनसूया २ श्रीदत्तजन्म

३ बालपण आणि तीर्थाटन ४ तीर्थाटनांतील आत्मचिंतन

५ त्रिमूर्ति रहस्य ६ श्रीदत्तोपासना

७ श्रीदत्तोपदेश ८ श्रीगुरुपूजन—स्तवन—आरत्या इ.

[ मुखपृष्ठावरील चित्र श्री. गजानन महाराज बोरकर यांच्या चिंचवड येथील श्रीदत्तमंदिरांतील मूर्तीचें आहे. ]

ॐ

आधुनिक काळांतील महान् साक्षात्कारी श्रीदत्तभक्त

लोकांना सन्मार्ग दाखविणारे परोपकाररत कर्मयोगी

ज्योतिर्विद आणि सिद्धवाक् सत्पुरुष

श्री गजानन महाराज



[ श्री. गोविंद जनार्दन बोरकर ]

यांस

सादर समर्पण

# प्रास्ताविक

प्राचीन काळापासून कर्म–उपासना–ज्ञान हे परमेश्वर–प्राप्तीचे मार्ग ठरून गेले आहेत. पैकीं कर्म व ज्ञानमार्ग हे त्यांतील तंत्रांमुळें सामान्य लोकांना आचरण्याला कठिण व उपासनामार्ग हा कुठेंही व केव्हांही बसल्या जागींच आचरतां येण्यासारखा असल्यामुळें सर्वांना सुलभ असतो. मात्र ही सुलभता केवळ बौद्धिक व तंत्रदृष्ट्याच सुलभ समजावयाची आहे. मानसिक तयारीच्या दृष्टीनें हा मार्गही इतर मार्गांइतकाच कठिण आहे. कारण या मार्गाला लागणारें मनोबल व संयम सहजासहजीं प्राप्त होत नसून त्यांनाही दीर्घ अभ्यास व कांहीं तरी शिस्तशीर आचार यांची आवश्यकता असतेच. तुकाराम महाराजांनीं भक्तीला 'सुळावरची पोळी' म्हटलें आहे, तें याच कारणामुळें.

या उपासना अथवा भक्तिमार्गांत जीव–शिवाचें ऐक्य मानलेलें असलें तरी प्रत्यक्ष आचार उपास्य व उपासक यांची भिन्नता व उपास्याचें उपासकापेक्षां श्रेष्ठत्व मानूनच चालतो. या उपास्यांत परमेश्वराचे अनेक अवतार समाविष्ट झालेले असून आत्रेय श्रीदत्त हा ब्रह्म–विष्णु–महेशांचा एकत्रित अवतार आज कित्येक शतकें जनमनाची पकड घेऊन बसलेला आहे. शिवाय रामकृष्णादि अवतारांप्रमाणें या अवताराचें कार्य विशिष्ट कालापुरतें व कार्यापुरतें मर्यादित नसून हा अवतार स्थळ–कालादि भेद न मानतां भक्तांचें सदैव कल्याण करीत असतो आणि त्यासाठीं आवश्यक तर पुनः पुनः अंशरूपानें अवतरत असतो अशी समजूत आहे.

महाराष्ट्रांत श्रीज्ञानेश्वरांनीं भागवत धर्माचा पाया घातला त्याच्याही पूर्वीपासून श्रीदत्तोपासना चालू आहे. आणि अलीकडे पाश्चात्य सुधारणांच्या तावडींत सांपडलेल्या धर्माच्या ग्लानिकालांतही श्रीदत्त हें दैवत हजारों घरांतून पूजिलें जातें. तेव्हां अशा या दैवतासंबंधी शक्य तितकी सांगोपांग माहिती लहान लहान पुस्तिकांच्याद्वारा दिल्यास तिचा अनेक दत्त–भक्तांना उपयोग होईल असें वाटल्यामुळें या पहिल्या पुस्तिकेंत श्रीदत्तात्रेयाचा अवतार, त्याचें कार्य, उपदेश, उपासना इ. विषय घेतले आहेत.

—संपादक

# १ अत्रि आणि अनसूया

धन्य धन्य अत्रि मुनी । धन्य अनसूया साजणी ॥
परात्मा आणिला ज्यांनीं । नामरूपा आश्चर्य हें ॥ १ ॥

—श्री दत्तमहात्म्य.

उत्पत्ति, स्थिति आणि लय या तीन अवस्था अखिल विश्वांतील वस्तुजाताच्या मागें लागलेल्या आहेत. आणि आपल्या पूर्वजांनीं या तीन अवस्थांच्या अनुक्रमें ब्रम्हा, विष्णु आणि महेश अथवा शंकर अशा तीन अधिष्ठात्री देवता कल्पिल्या आहेत. म्हणजे सृष्टीची उत्पत्ति करण्याचें कार्य ब्रह्मदेवाकडे, तिचें संगोपन व पोषण करण्याचें कार्य श्रीविष्णूकडे नि शेवटीं संहार करण्याचें कार्य श्रीशंकराकडे असतें असें मानलेलें आहे.

या कल्पनेप्रमाणें ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न करण्यासाठीं प्रथम सात मानसपुत्र उत्पन्न केले. त्यांत पहिला मरीचि नि दुसरा अत्रि होय.

या अत्रिऋषीच्या पत्नीचें नांव अनसूया असें असून ती कवि कर्दम ऋषीची कन्या होती. हिच्या सौंदर्याचें वर्णन करतांना कवि म्हणतातः

चंद्रतुल्य तिचें सौंदर्य । म्हणतां वाटे मना भय ॥
कलंकी तो तिचा तनय । कलांचा क्षय जयाच्या ॥ १ ॥
पूर्णिमेसी पूर्ण हो जरी । तरी सरतांचि रात्री ॥
निस्तेज होय त्याची सरी । कोण करी अनसूयेसी ? ॥ २ ॥
तेजस्वी सूर्य म्हणों तरी । उदयास्त असे बरोबरी ॥
अनसूयेच्या तेजापरी । नित्य तेज दावी कोण अंगीं ? ॥ ३ ॥

हिच्या पातिव्रत्याच्या अनेक कथा पुराणान्तरीं सांगितल्या आहेत. त्यांतली एकच इथें सांगूं :–

प्रतिष्ठान नगरांत 'कौशिक' नांवाचा एक व्याधिग्रस्त व व्यसनी ब्राह्मण रहात असे. त्याची स्त्री 'शांडिली' ही महापतिव्रता होती. त्या व्याधिष्ट, भ्रष्ट व कोपिष्ट अशा पतीलाही देवाप्रमाणें मानून ती त्याची तत्परतेनें सेवा करी.

एके दिवशीं अंधाऱ्या रात्रीं त्यानें आपल्याला एका वेश्येकडे घेऊन चल असा बायकोजवळ हट्ट धरला! ही पतिव्रता त्याप्रमाणें पतीला खांद्यावर घेऊन निघाली.

वाटेंत त्यांना 'मांडव्य' ऋषि एका सुळावर टांगलेले दिसले. त्यांना चोर समजून राजाज्ञेनें सुळीं देण्यांत येत होतें! त्या क्लेशानें ते विव्हळत असतां या साध्वीच्या खांद्यावर लोंबकळणाऱ्या 'कौशिक' ऋषीच्या अंगाचा त्यांना धक्का लागला. त्यामुळें त्यांना भयंकर वेदना झाल्या. त्या दुःखभरांत मांडव्यानें शाप दिला कीं "ज्यानें मला हें दुःख दिलें तो सूर्योदय होतांच मरण पावेल!"

या साध्वीला तें ऐकून वाईट वाटलें व रागही आला. ती म्हणाली "मी जर खरी पतिव्रता असेन तर ज्याच्या उदयाबरोबर माझ्या पतीचा अंत होणार तो सूर्य कधींच उगवणार नाहीं!"

पतिव्रतेच्या या वाक्‌सिद्धीमुळें सूर्याला उदयास येता येईना. त्यामुळें लोकांचे सर्व व्यवहार व नित्यकर्में थांबलीं. चोहोंकडे हाहाःकार झाला.

हें संकट दूर करण्याकरतां सारे देव ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवानें त्यांना सांगितलें :—

" आतां उपाय एक असे । तेजें तेज लोपतसे ॥
सूर्यापुढें दिवे जैसे । सतीसमूह तसे अनसूयेपुढें ॥ १ ॥
पतिव्रता गणनीया । मनःस्विनी अनसूया ॥
तिला तुम्ही प्रार्थनियां । चला घेउनियां पैठणासी ॥ २ ॥

त्याप्रमाणें देव अनसूयेकडे गेले. तेव्हां अनसूयेनें त्या सतीचा पति सूर्योदयाबरोबर मृत झाला तरी आपल्या पातिव्रत्यबलानें पुनः जिवंत करण्याचें अभिवचन देऊन सूर्याच्या मार्गातील सतीचा शाप दूर केला.

सूर्य उदयास येतांच त्या सतीचा पति मरण पावला. तेव्हां अनसूया म्हणाली :— " हे कल्याणि, तूं खेद करूं नको. भर्तृतुल्य दुसरें दैवत मी जाणत नाहीं, हें जर खरें असेल तर हा विप्र रोगमुक्त होऊन उठो ! कायेनें, वाचेनें, व मनानें जर मी सर्वदा पतिनिष्ठ राहिल्यें असेन तर हा द्विज जिवंत होवो ! "

( —मा. पुराण ).

असें म्हणतांच तो कौशिक ब्राह्मण जिवंत झाला.

सूर्यावरील संकट दूर झाल्यामुळें देवांनीं संतुष्ट होऊन अनसूयेस ' वर माग ' म्हटलें, तेव्हां स्त्रीस्वभावाला अनुसरून ती म्हणाली :—

" देव जर प्रसन्न झाले असतील तर देवाधिदेव जे ब्रह्मा-विष्णु-महेश ह्यांनीं माझें पुत्रत्व स्वीकारावें " यावर ' ठीक आहे, तसें होईल ' असें म्हणून देव तिचा निरोप घेऊन स्वस्थानीं गेले.

## २ श्री दत्तजन्म

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें देवांनीं अनसूयेला जो वर दिला तो कसा खरा झाला हें या प्रकरणांत सांगावयाचें आहे :—

अनसूयेच्या पतिनिष्ठेचा प्रभाव ऐकून उमा-रमा-सावित्री या अनुक्रमें महेश, विष्णु व ब्रह्मा या त्रिवर्गांच्या पत्न्यांना तिचा मत्सर वाटूं लागला. खुद्द देवांनाही ती स्वर्गलोकांतलें आपलें वैभव हिरावून घेईल कीं काय अशी पोटांत भीति वाटत असेच. म्हणून ते एक दिवस आपला प्रमुख जो इंद्र त्याला घेऊन ब्रह्मा-विष्णु-महेशांकडे गेले. इंद्र म्हणाला : "काय सांगावें ? या महापतिव्रतेचा आचार पाहून सूर्यसुद्धां भितो. तिला ऊन लागेल म्हणून तो मंद मंद तळपूं लागला आहे. अग्नि शीतल होऊन वागत आहे. वारा मंदमंद वहात आहे. भूमि मऊ झाली आहे. आम्हांपैकीं कोणत्या देवाचें स्थान ती केव्हां हिरावून घेईल याचा नेम नाहीं. एखाद्याला ती वर देईल तर तोही आम्हांला मारूं शकेल. तेव्हां आतां याला कांहीं तरी उपाय काढून आम्हांला भीतिमुक्त करा. नाहींतर आम्हीं आपण होऊनच आपले तिच्या घरीं जाऊन तिची सेवा करीत तरी राहतां !"

ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या पत्न्यांनीही आपल्या यजमानांना भर देऊन "तुम्हीं मृत्युलोकीं जाऊन त्या साध्वीचें सत्व-

हरण करा," अशी गळ घातली. तेव्हां ते तिघे ब्राह्मणांचा वेष घेऊन मृत्युलोकीं अत्रि ऋषींच्या आश्रमीं आले.

त्यावेळीं अत्रिऋषि गंगेवर अनुष्ठानासाठीं गेले होते. अनसूया एकटीच आश्रमीं होती. हे तिघे ब्राह्मण अकस्मात तिथें आले नि सांगूं लागले, "आम्हांला भूक लागली आहे. तुम्हीं इच्छाभोजन देतां असा लौकिक ऐकून येथें आलों. तेव्हां तुमच्याकडून लौकर भोजन मिळेल तर थांबतों; नाहींतर पुढें चाललों !"

अनसूयेनें त्यांचें स्वागत केलें. गंधाक्षतांनीं त्यांची पूजा केली. आणि त्यांना सांगितलें, "तुमचीं नित्यकर्मे आटोपून या. तोंपर्यंत मी भोजनाची तयारी करतें."

ते त्रिवर्ग अतिथि म्हणाले "आमचें स्नान झालें आहे. अत्रिऋषि येण्याला अवकाश लागेल. तेव्हां आम्हांला प्रथम भोजन देत असशील तर राहतों."

अनसूया म्हणाली, "ठीक आहे. या बसा पाटांवर."

असें म्हणून तिनें त्यांना बसावयास पाट दिले. आणि सर्वांपुढें पानें मांडून शाक-पाक-दूध-तूप घेऊन ती वाढावयास आली. तोंच या अतिथींनीं अशी विचित्र मागणी केली कीं, "बाई, आम्ही अतिथि फार दूर देशाहून आलों आहों. तुझें हें सुंदर रूप पाहून आम्हांला इच्छा झाली आहे कीं तूं आम्हांला नग्न होऊन अन्न वाढावें ! बोल, तयारी असली तर वाढ, नाहींतर आम्ही आपले जातों निघून !"

ही विचित्र मागणी ऐकून अनसूया क्षणमात्र गोंधळांत पडली. पण तिनें लगेच ताडलें कीं, माझ्या सत्त्वाची परीक्षा

पाहण्यासाठीं हे कोणी तरी ब्राह्मणरूपानें येथें आले आहेत. यांना विन्मुख वालविलें तर पति-आज्ञा–भंग होईल. माझें मन निर्मळ असल्यावर मला कशाची भीति आहे? माझ्या पतीच्या तपश्चर्येचें बळ माझें रक्षण केल्याशिवाय राहणार नाहीं.

असा मनांत विचार करून आणि हे आपले बालक आहेत असा मनाशीं संकल्प करून अनसूया त्या अतिथींना म्हणाली :

" कांहीं हरकत नाहीं. मी तुमच्या इच्छेप्रमाणें वाढतें "

असें म्हणून ती पुनः स्वयंपाकघरांत गेली. तिनें आपलें वस्त्र सोडून ठेविलें आणि पतीची प्रार्थना केली कीं, " हे अतिथि माझीं बाळें होऊं देत; म्हणजे मला निःशंकपणें त्यांना वाढतां येईल."

पतीची अशी प्रार्थना करून ती बाहेर आली. तों काय? तिथें तीन बाळें आपले चिमुकले हातपाय चाळवीत तिच्या-पुढें लोळत आहेत!

अनसूयेला पान्हा फुटला. तिनें त्या तिघांनाही उचलून स्तनपान करविलें आणि नंतर पाळण्यांत घालून ती त्यांना गाणें म्हणत निजवूं लागली!

अत्रिऋषि आपलें नित्यकर्म ( अनुष्ठान ) आटोपून मध्यान्हकाळीं आश्रमीं आले तों आपली पत्नी पाळण्यांत तीन मुलांना घालून पाळणा हलवीत बसली आहे असें दृश्य त्यांच्या दृष्टीस पडलें!

ऋषींनीं योगबलानें सर्व जाणलें. आणि त्या ब्रह्मा-विष्णु-महेशांना साष्टांग नमस्कार घातला. इतक्यांत दुसरा चमत्कार म्हणजे ते बालक त्या पाळण्यांत तसेंच असतांना ब्रह्मा-विष्णु-महेश आपल्या मूळ स्वरूपांत तिथें प्रगट झाले आणि त्या उभय पति-पत्नींना धन्यवाद देऊन त्यांनीं त्यांना 'पाहिजे तो वर मागा' म्हणून सांगितलें.

अत्रिऋषि अनसूयेला म्हणाले, "तुझी काय इच्छा असेल ती माग."

अनसूया म्हणाली, "प्राणेश्वरा, तुमच्या भक्तीनें देव प्रसन्न झाले आहेत, तेव्हां त्यांच्या जवळ पुत्र मागा."

ऋषि म्हणाले "बरें तर."

असें म्हणून त्यांनीं त्या त्रिमूर्तींकडे वर मागितला कीं, हे तिघे बालक आमच्या आश्रमीं पुत्रांप्रमाणें रहावे असें करा.'

त्रिमूर्तींनीं ऋषीचें म्हणणें मान्य केलें आणि त्याप्रमाणें ते तीन्ही बालक अत्रिऋषींच्या आश्रमीं कायमचेच राहिले! सती अनसूयेनें त्यांचें सर्वप्रकारें भरण-पोषण केलें. त्यांपैकीं ब्रह्मदेव-बालकाचें नांव 'चंद्र' असें ठेविलें; विष्णुमूर्तीचें 'दत्त' असें नांव ठेविलें; आणि महेश ऊर्फ शंकर 'दुर्वास' झाले.

पुढें कांहीं कालानें व्रतबंध ( मुंज ) झाल्यावर चंद्र आणि दुर्वास आपल्या माता-पित्यांचा निरोप घेऊन तपश्चर्येसाठीं निघून गेले आणि श्रीविष्णु दत्तरूपानें तिथें राहिले. चंद्र-

दुर्वासांनीं जातांना आपापलें तेज आणि गुणविशेष श्रीदत्तां-च्याच ठिकाणीं ठेविले होते. म्हणून पुढें श्रीदत्त ही देवता त्रिगुणांचें प्रतीक समजली गेली. श्री 'दत्तात्रेय' हें नांव 'आत्रेय दत्त' या अर्थानें पुढें अधिक रूढ झालें. हेंच सर्व गुरूंचें मूळ पीठ आहे.

या कथेंतील अनसूयेच्या सत्त्वहरणाचा प्रयत्न आणि त्या प्रयत्नाच्या विफलतेमुळें पुढें या सत्त्व-रज-तमात्मक ब्रह्मा-विष्णु महेशांना घ्यावें लागलेलें प्रायश्चित्त मिळून हा जगदुद्धारक आत्रेय दत्ताचा अवतार झाला असें म्हणतां येईल.

ह्या दत्तजन्माच्या वेळची सृष्टीची आनंदी स्थिति वर्णिली आहे ती पुढीलप्रमाणें:--

पुष्पें वर्षती सुरवर । वारा चाले मनोहर ॥
जगीं आनंद होय थोर । परात्पर अवतरतां ॥ १ ॥
वांझ वृक्ष झाले सफळ । वंध्यापोटीं आले बाळ ॥
पळोनि गेला दुष्काळ । अवतरतां मूळ पुरुष हा ॥ २ ॥

## ३ बालपण आणि तीर्थाटन

एकदां मानुषी रूप धारण केल्यानंतर परमेश्वराला झालें तरी लोकव्यवहाराप्रमाणें वागावें लागतेंच. कारण लोकांच्या चालीनें चालल्याशिवाय त्यांचा विश्वास संपादन करून उन्नतिपथावर त्यांना नेण्याचें कार्य कठिण होतें. म्हणून अत्रिऋषींच्या आश्रमांत असतां बालदत्ताच्या बालस्वभावाला सहज अशा क्रीडा नेहमीं चालत आणि त्यांनीं अत्रि-अनसूया परम संतोषित होत.

बोलोनि बोबडे बोल । मुग्ध चेष्टा करी केवळ ॥
मुक्या करी जो वाचाळ । त्याचा खेळ काय हा ॥ १ ॥
जो वामवी पांगुळा । तो अडखळे वेळोवेळां ॥ विश्वाधार
तो अनसूयेच्या गळां । मिठी घाली लवलाहें ॥ २ ॥
ज्या ज्या बाळलीला सकळ । दावी मातेसी करूनि खेळ ।
जमवूनि मुनींचे बाळ । सवें खेळे त्यांसवें ॥ ३ ॥
अनसूया बोलवी भोजनार्थ । नये गुंतुनी क्रीडार्थ ॥ माता
धरावया येत । दुडु दुडु धांवत जातसे ॥ ४ ॥
माता पाठीं लागतां । योग्यां अगम्य तो नये हातां । तिची
देखोनि श्रांतता । तिच्या हातीं यई स्वयें ॥ ५ ॥
ब्रम्हांडें ज्याचे उदरीं । त्याला धरी कमरेवरी ॥ म्हणूनि
बैसवीतां मंदिरीं । मृत्तिका शरीरीं माखी दत्त ॥ ६ ॥
दाखवूनियां नाना लीला । हर्ष देई माता-पितरांला ।
भक्तवशता दावी जगताला । जो एकला असंग ॥ ७ ॥

असो. होतां होतां आठव्या वर्षी बालदत्ताची मागें सांगितल्याप्रमाणें मुंज करण्यांत आली आणि ऋषींकडून त्याला मंत्रोपदेश करण्यांत आला.

हा मौंजीबंधनाचा विधि म्हणजे दुसरा जन्मच असतो. कारण हा विधि होतांच आयुष्याला एकदम कलाटणी मिळून निराळें वळण लागतें. बालपणचा स्वैराचार थांबतो, यमनियमांच्या उपाधि मागें लागतात आणि शिस्तशीर वर्तनक्रम सुरू होतो.

श्रीदत्तांच्या बाबतींत गुरूकडून मंत्रोपदेश होणें केवळ निमित्तमात्रच होतें, हें उघड आहे. पण लौकिकाचारासाठीं हा विधि होतांच श्रीदत्तांच्या वर्तनक्रमांत एकदम बदल झाला. ते एखाद्या महान विरक्तासारखे वागूं लागले.

लौकरच त्यांनीं माता-पितरांचा निरोप घेऊन गृहत्याग केला आणि पुढें कौपीनादिकांचाही त्याग करून ते स्मशानांत जाऊन नामाग्र दृष्टि लावून ध्यानस्थ होऊं लागले.

ही त्यांची अलौकिक वृत्ति पाहून पिंगलयाग, साध्यदेव असे अनेक परमार्थसाधक त्यांस शरण गेले व त्यांनीं या उपजत योगिराजापासून योगदीक्षा घेतली.

दुसऱ्या एका कथेंत मौंजीबंधन होतांच श्रीदत्त सह्यपर्वतावर गेले आणि तिथें अनेक वर्षें वायुभक्षण करून तपश्चर्या करीत राहिले असें वर्णन आहे. त्या ठिकाणीं पुढें त्यांची शिष्यशाखाही मोठी झाली. तेव्हां या शिष्यांत खरे कोण नि खोटे कोण याची परीक्षा करण्यासाठीं श्रीदत्तांनीं तिथल्या डोहांत उडी टाकली. कित्येक दिवसपर्यंत ते बाहेर आलेच नाहींत; तेव्हां पुष्कळ शिष्य कंटाळून निघून गेले. निष्ठावान होते तेवढेच राहिले.

पुढें श्रीदत्त त्या डोहांतून अकस्मात बाहेर आले, ते एका हातांत मद्यपात्र नि दुसऱ्यांत एक सुंदर स्त्री घेऊन आले. सर्वांना त्यांना पाहून आश्चर्य वाटलें. परंतु सात्विक व श्रद्धावान शिष्यांनीं श्रीदत्तांचें खरें स्वरूप ओळखलें व त्यांना शरण जाऊन आत्मज्ञान करून घेतलें, अशी कथा आहे.

या कथेचं तात्पर्य श्रीदत्तांची योगिराज म्हणून प्रसिद्धि झाल्यावर अनधिकारी लोकांच्या संसर्गाची उपाधि टाळण्यासाठीं श्रीदत्तराज दीर्घकाल गुप्तरूपानें किंवा वेष पालटून हिंडत होते असें घेतां येईल.

या वेळच्या त्यांच्या दिनचर्येचें वर्णन 'श्रीदत्तमहात्म्यांत' पुढीलप्रमाणें केलें आहे :—

ज्याचें नित्य गंगास्नान । माहूरीं करी शयन ॥
सह्याद्रीवरी आसन । करी ध्यान गाणगापुरीं ॥ १ ॥
कुरुक्षेत्रीं आचमन । धोपेश्वरीं जाऊन ॥
करी जो भस्मधारण । संध्यावंदन कऱ्हाडीं ॥ २ ॥
कोल्हापुरीं भिक्षाटन । पांचाळेश्वरीं जाऊन ।
नित्य करी भोजन । विचित्राचरण जयाचें ॥ ३ ॥
पंढरपुरीं जाऊन । नित्य सुगंध लेवून ॥
पश्चिमसागरीं येऊन । करी अर्घ्यदान सायंकाळीं ॥ ४ ॥
जो जो करील स्मरण । त्या त्या देई दर्शन ।
व्यापिलें जेणें त्रिभुवन । असो नमन तच्चरणां ॥ ५ ॥

## ४ तीर्थाटनांतील आत्मचिंतन

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तीर्थाटन करतांना श्रीदत्तांचें सूक्ष्म निरीक्षण आणि आत्मचिंतन चालू होतें. आणि क्षणोक्षणीं दिसणारीं दृश्यें आणि घडणाऱ्या घटना यांपासून ते बोध घेत होते.

हीं दृश्यें आणि घटना हेच आपले गुरू होत असें ते मानीत. हे गुरू एकंदर चोवीस होते, असें त्यांच्या चरित्रांत सांगितलें आहे :—

(१) पृथ्वी—हिच्यापासून क्षमा हा गुण श्रीदत्तांनीं घेतला. श्रीएकनाथ महाराज सांगतात :—

"पृथ्वी दाहें करून जाळिली । नांगर घालूनि फाडिली ॥
लातवरीं तुडविली । तोडिली झाडिली पैं भूतीं ॥ १ ॥

तो अपराधु न मानूनि क्षिती । सर्वेचि भूतांतें प्रसन्न होती ॥
तियेंचि पिकवूनि नानासंपत्ति । तृप्ति देती भूतांतें ॥ २ ॥

अशा या धरणीमातेकडून क्षमा हा गुण श्रीदत्त शिकले.

( २ ) **वायु**–"वायु सर्वांतें स्पर्शोनि जाये । परी अवघ्याला कोठें न राहे ॥ तैसें विषय सेवितां पाहें । आसक्त नव्हे योगिया ॥ १ ॥ (ए. भा.)

अशा या वायूपासून विषयांसंबंधी अनासक्ति हा गुण श्रीदत्त शिकले.

( ३ ) **आकाश**–" गगन बुडालें दिसे डोहीं । परी तें उदकें भिजलेंचि नाहीं ॥ तैसा असोनियां सर्व देहीं । अलिप्त पाहीं योगिया ॥ १ ॥ (ए. भा.)

अशा ह्या आकाशापासून अचलत्व, व्यापकत्व, निर्मलत्व इत्यादि गुण श्रीदत्तांनीं घेतले.

( ४ ) **उदक**–हें मधुर असतें आणि त्याचा संग शीतल असून दुसऱ्यास शुद्ध व पवित्र करणारा आहे.

" उदकीं रिघाले जे समळ । ते स्वभावें करी निर्मळ ॥
परी न धरी अहंबळ । जे म्यां हे मळ क्षाळिले ॥ १ ॥
(ए. भा.)

अशा या उदकापासून पावित्र्य व पावनत्व हे धडे श्रीदत्तांनीं घेतले.

( ५ ) **अग्नि**–सर्व जगाचा प्रकाशक होऊनही निःसंग राहण्याचा गुण अग्नीच्या ज्योतींत आहे. शिवाय

अग्नी असे निराकार । काष्ठ मिळतां तदाकार ॥
दिसे तसा हा साकार । नाना शरीरयोगें आत्मा ॥ १ ॥

म्हणजे निरनिराळ्या जळणाऱ्या वस्तूंच्या आकाराप्रमाणें तो जरी निरनिराळ्या आकारांचा दिसला तरी तो निराकारच

असतो. आत्म्याचें निःसंगत्व व निराकारत्व हे गुण अग्नीनें श्रीदत्तांना शिकविले.

(६) **सोम अथवा चंद्र**—हा अखंड असूनसुद्धां त्याच्या कलांच्या क्षयवृद्धित्वामुळें तो लहानमोठा झालेला दिसतो. वास्तविक तो सदा समच असतो. त्याचा लहान-मोठेपणा हा आपल्या डोळ्यांना झालेला भास असतो. चंद्रासंबंधानें दुसरी गोष्ट म्हणजे त्याचें शीतलत्व.

तात्पर्य आत्म्याचें अखंडत्व, शीतलपणा आणि त्रिविधतंत एकरूपता असणें हा बोध श्रीदत्तांनीं चंद्रापासून घेतला.

(७) **सूर्य**—हा केवळ तेजस्वी गोल. पण या जगाच्या धारणासाठीं त्याचें परोपकारव्रत अखंड चालू असतें. त्याच प्रमाणें त्याचें प्रतिबिंब घाणेरड्या डबक्यांत पडलें असतां तो मलिन झालेला दिसतो. आणि वेगवेगळ्या आकाराच्या भांड्यांत पाहिलें असतां तो अनेक झालासा भासतो. पण वस्तुतः त्याच्या ठिकाणीं कोणतेच दोष नसतात.

तात्पर्य निंदा–स्तुतीला कांटी लावून सदैव परोपकार करीत राहणें हा बोध श्रीदत्तांनीं सूर्यापासून घेतला.

(८) **कपोत**—म्हणजे कवडा हा आपलीं पिलें पारध्याच्या जाळ्यांत सांपडूं नयेत म्हणून त्यांची सदैव राखण करीत असतो. पण पारधी येतो तो त्या पिलांसकट सगळ्यांनाच जाळ्यांत पकडून घेऊन जातो! फाजील ममत्व हें प्राण्याला नाशाप्रत नेतें; म्हणून कोणी केवळ प्रपंचांत गुरफटून राहूं नये, हा बोध यापासून श्रीदत्तांनीं घेतला.

(९) **अजगर**–हा मिळेल तें खातो नि कांहीं न मिळालें तर वायु भक्षण करून असतो! श्रीदत्तांनीं त्याच्या या वृत्तीपासून बोध घेतला कीं :—

अदृष्ट असेल जें जें वेळे। तें तें मिळेल तेणें काळें॥
यालागीं त्याचें ज्ञान न मैळे। धारणा न ढळे निजबोधें॥१॥

—(ए. भा.)

(१०) **समुद्र**–'सर्वाभूतीं समभाव' नुसता समजून भागत नाहीं; ही समबुद्धि आचारांतही आली पाहिजे, हें समुद्र आपल्याला सांगत असतो. सागराची गंभीरता तर प्रसिद्धच आहे. हे दोन्ही गुण श्रीदत्तांनीं समुद्रापासून घेतले.

(११) **पतंग**–पतंग दिव्यावर झेप घालतो तो त्या दिव्यांतील मोहकता पाहून. पण हा मोह अंतीं त्याला मारक होतो. म्हणून कोणीही मोहवश होऊं नये, हा बोध श्रीदत्तांनीं पतंगापासून घेतला.

(१२) **भृंग किंवा भ्रमर**–हा फुलाला न दुखवितां मधुबिंदु तेवढाच त्यांतून काढून घेतो. कोणत्याही वस्तूंतला फापटपसारा काढून टाकून किंवा वगळून सार तेवढें नेमकें काढून घ्यावें ही गोष्ट श्रीदत्त भ्रमरापासून शिकले.

(१३) **हत्ती**–हा केवढा अवाढव्य प्राणी! पण तो स्त्रैण असल्यामुळें हत्ती पकडणारे लोक लांकडाच्या हत्तिणी हुबेहुब तयार करून त्याला खड्ड्यांत आणून पकडतात! सुंदर स्त्री दिसली तर तिला दुरूनच नमस्कार करावा, हा बोध श्रीदत्तांनीं या गोष्टीपासून घेतला.

( १४ ) **मधमाशी**–विचारी किती कष्ट करून बिंदु–बिंदूचा संग्रह करते ! पण शेवटीं लोक तिचें मोहोळ अचानक काढून नेतात. अतिरिक्त संग्रह करूं नये, हा बोध यावरून श्रीदत्तांनीं घेतला.

( १५ ) **मृग म्हणजे हरिण**–हा चपल आहे, पण नादलुब्ध आहे. त्यामुळें पारधी त्याला नादांत गुंतवून पकडतात. यावरून श्रीदत्तांनीं धडा घेतला कीं, नादविषयापासून सावध असावें.

( १६ ) **मासा**–बिचारा पाण्यांत स्वैर संचार करीत असतो. पण कोळी त्याला गळ टाकून पकडतो. माशाची खाण्याची अनिवार इच्छा हीच त्याच्या नाशाला कारण होते. म्हणून आपली जीभ ताब्यांत ठेवावी हें श्रीदत्त माशापासून शिकले.

( १७ ) **पिंगला**–ह्या नांवाची एक वेश्या होती. ती धनाच्या आशेनें देहविक्रय करी. पण पुढें एका प्रसंगानें पश्चात्ताप होऊन ती ईश्वरभजनीं लागली अशी एक कथा आहे. 'आशा हें दुःखाचें मूळ आहे' हा बोध श्रीदत्तांनीं या कथेपासून घेतला.

( १८ ) **टिटवी**–एकदां एक टिटवी तोंडांत मांसाचा गोळा घेऊन बसली होती. तेव्हां त्या तुकड्यापायीं इतर शेंकडो पांखरांनीं येऊन तिचा छळ मांडला. शेवटीं तिनें आपल्या तोंडांतला तुकडा टाकून दिला तेव्हां तिच्या मागचा सारा त्रास मिटला. म्हणून 'अपरिग्रही वृत्ति'च कल्याणकारी होते, हा बोध या टिटवीपासून श्रीदत्तांनीं घेतला.

(१९) **बाल किंवा अर्भक**:—याचें अव्याज मनोहरत्व सर्वांनाच आकर्षक वाटतें.

"जो मनोरथ न करी। आपण आपुल्यासीं क्रीडा करी॥
आपणावरी प्रीती करी। यापरी बाल सुखी॥ १॥

म्हणून सदैव बालवृत्ती असावी, हें श्रीदत्त लहान मुलापासून शिकले.

(२०) **कुमारी**:—एका घरीं एक कुमारी पाहुणे आले म्हणून त्यांच्यासाठीं तांदूळ सडूं लागली. पण ते सडतांना हातांतील कांकणें वाजूं लागलीं. तेव्हां आपल्या घरांत तांदूळ नाहींत हें वैगुण्य तिऱ्हाइतांच्या लक्षांत येतां नये म्हणून तिनें हातांत एकच बांगडी ठेवून बाकीच्या काढून ठेविल्या. तेव्हां आवाज बंद झाला नि गुह्यस्फोट टळला! 'अनेकत्व सोडून एकत्व सेवावें' हा बोध श्रीदत्तांनीं या गोष्टीपासून घेतला.

(२१) **लोहार**:—एक लोहार एकदा बाणाला टोंक काढण्यासाठीं भाता घेऊन बसला असतां इतका तल्लीन झाला होता कीं, त्या वाटेनें राजाची स्वारी वाजत गाजत गेली तरी त्याला त्याची दाद नव्हती! ध्येयसिद्धीसाठीं मनाची एकाग्रता कशी असावी लागते हें श्रीदत्त यापासून शिकले.

(२२) **सर्प**:—हा आपलें असें स्वतंत्र घर करीत नाहीं. एखाद्या बिळांत तात्पुरता गुप्त राहतो व एका ठिकाणीं फार वेळ न राहतां आपलें राहण्याचें स्थल वारंवार बदलतो.

विरक्त पुरुषांनीं मठाचा किंवा आश्रमाचा खटाटोप करूं नये, हा बोध श्रीदत्तांनीं सर्पापासून घेतला.

( २३ ) **कोळी**:—हा आपलें जाळें कसें विणतो हें पुष्कळांनीं पाहिलें असेलच. त्याच्या ह्या घराला वेगळा गवंडी, माती किंवा इतर साहित्य लागत नाहीं. त्याचें अंग हेंच त्याचें सारें साहित्य ! त्या कोळ्याप्रमाणेंच ईश्वर ही विविध सृष्टि आपल्या ठिकाणीं दाखवितो हें श्रीदत्त कोळ्यापासून शिकले.

( २४ ) **भिंगरी** किंवा **भिंगुरी**:—ही एखाद्या किड्याला एका ठिकाणीं डांबून ठेवून त्याच्या सभोंवतीं मातीचें घर बांधते आणि वारंवार येऊन त्याला टोंचते ! तो किडा ही अवदसा केव्हां येईल या चिंतेंत सदैव निमग्न असतो. इतका कीं शेवटीं त्याचें त्या भिंगरींतच रूपांतर होतें ! याला " भृंगकीटक न्याय " म्हणतात. माणसाला ईश्वररूप बनावयाचें असेल तर त्याला परमेश्वराचें एकांतिक ध्यान अवश्य आहे, हा बोध यावरून श्रीदत्तांनीं घेतला.

अशा रीतीनें ह्या जगांत फिरत असतांना श्रीदत्तांनीं अनेकांपासून अनेक प्रकारचा बोध घेतला आणि पुढें जगत्-कल्याणासाठीं तो आचरूनही दाखविला.

## ५ त्रिमूर्ति रहस्य

काय असेल तें असो, पृथ्वीवरच्या सर्व देशांत सर्व धर्मांत तीन या संख्येला एक विशिष्ट स्थान व महत्त्व

आहे. ही सारी सृष्टि सत्त्व-रज-तम ह्या त्रिगुणांनीं युक्त आहे हें प्राचीन कालापासून आतांपर्यंत सर्वत्र मानलें जात आहे. आपल्या प्राचीन पूर्वजांनीं या प्रत्येक गुणाची एकेक देवता कल्पून त्यांना ब्रह्मा-विष्णु-महेश अशीं नांवें दिलीं व त्यांचीं कार्येंही उत्पत्ति-स्थिति-लय अशीं ठरवून टाकलीं. पण त्याबरोबरच एकच ब्रह्म किंवा चिच्छक्ति त्रिधा नटलेली असून साधकाच्या अधिकाराप्रमाणें त्याला आपापल्या उपास्याचें ध्यान-धारण करतां येईल हा विचार आमच्या सर्व धर्मग्रंथांना मान्यच आहे.

दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मा-विष्णु-महेश या तीन देवता अंशरूपानें या पृथ्वीतलावर अवतरल्या, म्हणून श्रीदत्तात्रेयाची मूर्ति त्रिशिरात्मक दाखविली जाते. शिवाय परब्रह्माच्या सत्, चित्-आणि आनंद अशा या त्रिविध स्वरूपाचें एकीकरण म्हणजेच ही त्रिशिर मूर्ति होय असेंही मानतात.

पण असें असलें तरी श्रीदत्ताचें एकमुखी स्वरूपही पुष्कळ ठिकाणीं दिसून येतें. हिंदुस्थानांतील काशी व पंढरपूर या प्राचीन व पवित्र क्षेत्रांत एकमुखी दत्तात्रेयाच्या मूर्ति आहेत. तसेंच कित्येक सनातनी दत्तभक्तांना साक्षात्कार झाला तो एकमुखी दत्ताचाच असेंही दिसून येतें. श्रीवासुदेवानंद सरस्वती एकमुखी दत्तालाच भजत असत हें प्रसिद्ध आहे. ‘ अनेकांत एकत्व ’ कसें पहावें हें शिकविण्यासाठींच हें प्रतीक आहे असेंही पुष्कळांचें मत आहे.

एका कल्पक लेखकानें कोळ्याच्या जाळ्याचा दृष्टान्त देऊन ही कल्पना स्पष्ट केली आहे. तो म्हणातो :

"कोळी जाळें विणूं लागतो तेव्हां तो आपल्या सृष्टीचा ब्रह्मा होतो. तो आंत राहून जाळ्याचें रक्षण करतो तेव्हां तो विष्णूप्रमाणें कार्य करतो आणि पुनः सारें जाळ्याचें सूत गिळून टाकतो तेव्हां तो सर्वसंहारक रुद्र बनतो. अशा त्या कोळ्याच्या सृष्टींत भिन्नकार्यरूपानें त्रिविधता झालीशी दिसली तरी कोळ्याहून भिन्न कांहींच नसतें. त्याप्रमाणें ब्रह्मा-विष्णु-महेश हे व्यक्त स्वरूपांत त्रिमूर्ति दिसले तरी ते वस्तुतः एक दत्तरूपच आहेत.

आध्यात्मिकदृष्ट्या या त्रिमूर्तीचें रहस्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्नही पुष्कळांनीं केला आहे. उदाहरणार्थ :—

"जेथें चारी वेद लाळ घोंटीत आहेत अशा शब्दब्रह्मानें झांकले असलेले दिव्य पाय, अध-ऊर्ध्व मिळून साही दिशांच्या अंतांना भिडलेले महा हात, आकाशाप्रमाणें व्यापक असा भक्तिवर्धक नीलवर्ण, व्यक्ताची उत्पत्ति स्थिति आणि लय दर्शविणारीं तीन शिरें, नादब्रह्माचा सूचक शंख, प्रभुत्व दाखविणारी गदा, कालाच्या गतीचें दर्शक चक्र, पुरुष आणि प्रकृतीचें द्योतक पद्म, त्रिगुणात्मक त्रिपुरांचा नाश करणारा त्रिशूळ, जगदुद्धाराकरतां अवतार हें दाखविणारा विभूति-चर्चित यतिवेष, पशुवृत्ति ठार केल्याचें दर्शक असें व्याघ्रचर्म, ज्ञानाचें चिन्ह असा सर्प, साक्षात् कृपाच अशी कामधेनु, जगाचें नश्वरत्व दाखविणारा

पार्श्वभूमिकारूप अश्वत्थ–औदुंबर असें हें दिव्य व परम-उदात्त असें ध्यान आहे. ”

शेवटीं श्रीदत्ताचीं तीन मुखें, सहा हात नि जवळचे दोन श्वान यांवर सुंदर कल्पना बसविलेलें पुढील पद्यही वाचकांना उद्बोधक वाटेल:—

## त्रिभुवन–धनी त्रिमूर्ति

( चाल फटक्याची )

जन ताराया त्रिविध परींचे ऐसें मनिं आणुनी ।
अघटित लीला तीन मुखांचा जाहला त्रिभुवनधनी ॥
काम-क्रोध-मद-मत्सर छळिती मम भजकां निशिदिनीं ।
सहा हस्त धरियले वाटतें षड्रिपु निर्दालनीं ॥
भक्तांचें मनमंदिर ।
फोडाया अति तत्पर ।
हा दुरभिमान तस्कर ॥
सवें आणिले श्वान दोन हे भाव दिसे यांतला ।
अनसूयेचा नंदन बरवा नयनीं मीं पाहिला ॥

—( सौ. कृष्णाबाई पाटील )

## ६ श्रीदत्तोपासना

कलियुगांत ‘ चंडी-विनायकां’प्रमाणेंच श्रीदत्तोपासना हीही त्वरित फल देणारी आहे असें मानतात. श्रीदत्तही स्वतः निरिच्छ असले आणि दत्तोपदेशांत परमार्थाचा भाग पुष्कळ असला तरी सकाम दृष्टीनें प्रपंच नेटका होण्यासाठींच या देवतेची आराधना विशेषेंकरून केली जाते.

महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच्या महानुभाव पंथानें श्रीदत्त-भक्तीचा प्रसार करण्यांत पुढाकार घेतला होता आणि ज्ञानेश्वरांचें परात्पर गुरुपीठ जो नाथपंथ त्याचाही बराचसा आचार श्रीदत्तसंप्रदायाशीं जुळणारा असाच होता. पण असें असलें तरी श्रीगुरुचरित्रनायक श्रीनृसिंहसरस्वतींच्या वेळींच त्याचा प्रसार विशेष झाला असें दिसतें. हुमणाबादच्या माणिकप्रभूंनीं आणि अगदीं अलीकडच्या श्रीवासुदेवानंद-सरस्वतींसारख्या विरक्तांनीं आणि श्रीनारायणमहाराज केडगांवकरांसारख्या राजयोग्यांनीं या सांप्रदायाच्या प्रसाराला पुष्कळच हातभार लावलेला आहे.

हा सांप्रदाय अद्वैती आहे. मात्र त्याबरोबरच उपासना अथवा भक्तिमार्ग हेंहि या सांप्रदायाचें वैशिष्ट्य आहे. आणि भक्तिमार्गांत उपास्य-उपासक हा भेद बाह्यतः तरी मानावाच लागत असल्यामुळें उपासकानें उपास्याच्या श्रेष्ठतेचें व अलौकिकतेचें आपापल्या संस्कृतीच्या पातळीवरून श्रद्धा-युक्त वर्णन करणें आणि तदनुरूप आचरण करणें ओघानेंच येतें.

'श्रीगुरुचरित्र' हा या सांप्रदायाचा वाचन-पठन-श्रवण करण्याचा ग्रंथ असून तो या सांप्रदायांत वेदतुल्य मानला जातो. श्रीदत्तांच्या अथवा त्यांच्या अवतारांच्या पादुकांचें पूजन व श्रीगुरुचरित्राचें वाचन विशिष्ट विधि-नियमांनीं बांधलेलें असलें तरी त्यांच्या मृण्मय प्रतिमांना अथवा छाया चित्रांना हे विधि-निषेध लागू नाहींत. म्हणूनच गरिबांच्या

झोंपडीपासून श्रीमंतांच्या वाड्यापर्यंत आणि षट्शास्त्रसंपन्न वेदोनारायणापासून अखंडसुवासिनी वेश्येपर्यंत सर्वांच्या बैठकीच्या ठिकाणीं वा शयनागारांत या त्रिमूर्तींचें दर्शन वाटेल त्याला घेतां येतें !

या सांप्रदायाचा आणखी एक विशेष म्हणजे तो कोणत्याही पंथाला परका मानीत नाहीं. शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त, भागवत इत्यादि कोणत्याही पंथाची व्यक्ति आपापल्या उपास्यदेवतांवर श्रद्धा ठेवून आणि इच्छेनुरूप त्यांची पूजा अर्चा करूनही या त्रिमूर्तिरूप दत्ताचें नित्य वा प्रासंगिक भजन-पूजन करूं शकते. आणि या भजनपूजनांत मोठेसें अवडंबर नसून आठवड्यांतून एक वेळ गुरुवारीं श्रीदत्तप्रतिमेला हार घालून गोड नैवेद्य दाखविणें आणि त्याचा प्रसाद म्हणून सर्वांनीं स्वीकार करणें एवढ्यानेंही या सांप्रदायाला समाधान असतें.

## ७ श्रीदत्तोपदेश

श्रीदत्तांचा अवतार हा मुख्यत: प्रवृत्ति-निवृत्तीची योग्य सांगड घालून केवळ प्रवृत्तीच्या मागें लागलेल्यांना ‘ मोक्षधर्मा ’ कडे वळविण्यासाठीं होता व आहे. ‘ आहे ’ म्हणण्याचें कारण परमात्म्याचे इतर अवतार हे विशिष्ट कार्यासाठीं झालेले होते तर हा दत्तावतार ‘ चिरंजीव ’ स्वरूपाचा असून गुरुकार्य सतत चालविणें हाच त्याचा प्रधान हेतु आहे. श्रीदत्तात्रेयाचें नांव घेतांना ‘ श्रीगुरुदेव ’

असें प्रथम म्हणून नंतर 'दत्त' असें म्हणतात त्याचें कारण हेंच.

श्रीगुरुदेवांनीं केलेला हा उपदेश श्रीदत्तचरित्रांत मुख्यतः अलर्क आणि भार्गव यांच्याशीं झालेल्या संवादांत आला आहे. हे दोघेही मूळचे रजोगुणी असून पुढें पश्चात्ताप होऊन श्रीगुरूंना शरण गेले अशा कथा आहेत. हा उपदेश सविस्तर देण्याला इथें अवकाश नाहीं. म्हणून त्याचें सार तेवढें थोडक्यांत देऊं :—

( १ ) अहंकार हेंच दुःखाचें मूळ आहे. त्याचप्रमाणें ममत्वबुद्धि हीच बंधाला कारण आहे. हीं दोन्ही ज्याचीं सुटलीं तो सदाच सुखी.

( २ ) पूर्वजन्मींच्या पापाचा क्षय होऊन चित्त शुद्ध झाल्याशिवाय जीवाची ज्ञानयज्ञाकडे प्रवृत्ति होत नाहीं.

( ३ ) सदसद्विचारानें विवेक, विवेकानें ज्ञान, ज्ञानानें वैराग्य व वैराग्यानें संग तुटून मोक्ष मिळतो. म्हणून सत् आणि असत् याचा नेहमीं विचार करावा.

( ४ ) मनोजयाचे मुख्य उपाय वैराग्य आणि अभ्यास हे आहेत. विषयांसंबंधीं दोषदृष्टि हें वैराग्याचें साधन असून यमनियमादि साधनांनीं योगाभ्यास करावा. या योगाभ्यासाच्या योगानें चित्तवृत्ति शांत होऊन सुख वाटूं लागतें, ज्ञान वाढतें, प्राणजय होतो व मनाला समाधान वाटतें.

( ५ ) मान विषासमान व अपमान अमृतासमान मानावा.

( ६ ) आकाश हातीं लागण्यासाठीं आपण जों जों अधिक

उंचीवर जावें तों तों आकाशही अधिकाधिक दूर होत जातें. किंवा आपल्याच छायेला धरूं इच्छिणाऱ्या मुलानें जसजसें तिच्या मागें धावावें तसतशी ती छायाही पुढें पुढें जाऊं लागते. त्याचप्रमाणें सुख हेंही आपल्या आटोक्यांत आलें असें वाटतें तोंच निसटून जातें !

(७) संपत्ति हेंच सुख म्हणावें तर अत्यंत धनवान लोकही दुःखी असलेले आढळतात. विद्वत्ता हेंच सुख म्हणावें तर अनेक विद्वान लोक इच्छापूर्ति न झाल्यामुळें दुःखी असलेले आढळतात. तेव्हां सुखाची भावरूप व्याख्या करण्याचा प्रयत्न सोडून दुःखाचा अभाव म्हणजे सुख अशी त्याची अभावरूप व्याख्या करावी लागते. अर्थात् ज्याला सुख मिळवायचें असेल त्यानें जेणेंकरून दुःखाचा अभाव होईल अशासाठीं यत्न केला पाहिजे. आणि दुःखाचें निर्मूलन करावयाचें म्हणजे प्रथम त्याच्या 'मूळा'चा शोध करून त्या 'मूळा'वरच कुऱ्हाड घातली पाहिजे.

( ८ ) 'पूर्व कर्म' अथवा 'नियति' यांचा प्रभाव ईश्वराच्या निष्काम व एकनिष्ठ भक्तांवर चालत नाहीं. तेव्हां परमेश्वराला निष्काम बुद्धीनें व अनन्य भावानें शरण जाणें हाच निःश्रेयसाचा मार्ग होय.

( ९ ) जगांत चैतन्य नेहमीं जड पदार्थाला धरून असलेलें दृष्टीस पडतें, त्याचप्रमाणें ईशचैतन्यही जड जगताला धरून राहात असलें पाहिजे. म्हणून सर्व जगच परमेश्वरस्वरूप मानावें.

(१०) मोठी कुशाग्रबुद्धि असली तरी केवळ तर्कानें म्हणजे सद्गुरुसेवेवांचून किंवा ईश्वरी कृपा झाल्यावांचून (अज्ञेयाचें) ज्ञान होण्यासारखें नाहीं.

(११) दृष्टि जोंवर बाह्य प्रवृत्तींचा त्याग करून शांत होत नाहीं तोंवर अंतर्मुखता प्राप्त होत नाहीं; आणि जोंवर अंतर्दृष्टि येत नाहीं तोंवर स्वरूपदर्शन होत नाहीं.

(१२) 'ज्ञान्या'चें लक्षण 'ज्ञान्या'शिवाय इतरांना ओळखतां येणें कठीण आहे. तथापि स्थूल मानानें विचार करतां मान आणि अपमान, लाभ आणि हानि, जय आणि पराजय, हे ज्याच्या स्वरूपांत थोडासाही बदल करण्यास समर्थ नसतात, आत्मानुभवाच्या संबंधांत एखादा गूढ प्रश्न केला तरी जो तत्काल आणि असंदिग्ध उत्तर देऊं शकतो, ज्ञानविषयक चर्चा करण्याचा ज्याला अतिशय उत्साह असतो, स्वभावतःच ज्याला व्यवहाराचा कंटाळा, ज्याची वृत्ति संतोषी, मन मोकळें आणि महत्संकटांतही जो शांत तो 'ज्ञानी' म्हणून समजावा.

या एकंदर उपदेशाकडे साकल्यानें पाहिलें असतां कर्म-त्यागापेक्षां सुबुद्ध कर्मयोगच श्रीगुरूंनीं उपदेशिला आहे असें दिसून येईल.

हा उपदेश माणसाला आत्मसमाधान देणारा आहे, आणि समाधान हें सुखाचें मुख्य साधन आहे हें सर्वांना मान्यच आहे.

आजपर्यंत अनेक दत्तभक्तांनीं वर्णाश्रमविहित कर्माचरणाचें —विशेषतः गृहस्थाश्रमांतील कर्तव्यांचें पालन करून-सुख

समाधान प्राप्त करून घेतलें आहे. म्हणून आपणही तोच मार्ग अनुसरावा.

## ८ श्रीगुरुपूजन–स्तवन–आरत्या इ.

श्रीशिवाचें प्रतीक ज्याप्रमाणें लिंग किंवा बाण, श्रीविष्णूचें प्रतीक शाळिग्राम किंवा श्रीगणपतीचें प्रतीक ज्याप्रमाणें नर्मदा–शिलाखंड त्याप्रमाणें श्रीदत्ताचें प्रतीक 'पादुका' हें आहे. अलीकडे श्रीदत्तात्रेयाचीं वेगवेगळ्या प्रकारचीं छायाचित्रेंही सर्वत्र मिळतात. या पादुकांची यथाविधि स्थापना करून नित्यपूजा करावी किंवा तसें जमण्यासारखें नसेल तर आपल्या आवडीचें असें एकादें छायाचित्र घरांतील शुचिर्भूत जागीं ठेवून त्याला हार घातलेला असावा आणि नित्य ठराविक वेळीं-निदान आठवड्यांतून गुरुवारीं तरी त्या प्रतीकापुढें नतमस्तक होऊन श्रीगुरूंचें चिंतन नि पुढें दिल्याप्रमाणें स्तवन करणें, आरत्या म्हणणें इत्यादि कार्यक्रम आचरावा.

### श्रीगुरुपादुकाष्टक

( श्रीनारायण विरचित )

ज्या संगतीनेंच विराग झाला । मनोदरींचा जड भास गेला ॥
साक्षात् परात्मा मज भेटवीला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ? ॥ १ ॥
सद्योगपंथें घरिं आणियेलें । अंगेंच मातें परब्रह्म केलें ॥
प्रचंड तो बोध-रवी उदेला । विसरूं कसा० ॥ २ ॥
चराचरीं व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची ॥
परंपदीं संगम पूर्ण झाला । विसरूं कसा० ॥ ३ ॥

जो सर्वदा गुप्त जनांत वागे । प्रसन्न भक्तां निजबोध सांगे ॥
सद्भक्तिभावाकरितां भुकेला । विसरूं कसा० ॥ ४ ॥
अनंत माझे अपराध कोटी । नाणी मनीं घालुनि सर्व पोटीं ॥
प्रबोधितां तो श्रम फार झाला । विसरूं कसा० ॥ ५ ॥
कांहीं मला सेवनही न झालें । तथापि तेणें मज उद्धरीलें ॥
आतां तरी अर्पिन प्राण त्याला । विसरूं कसा० ॥ ६ ॥
आतां कसा मी उपकार फेडूं । हा देह ओंवाळुनि दूर सोडूं ॥
त्यां एकभावें प्रणिपात केला । विसरूं कसा० ॥ ७ ॥
जया वानितां वानितां वेदवाणी । म्हणे 'नेति नेती' तिला जे दुरोनी ॥
नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला । विसरूं कसा० ॥ ८ ॥
जो साधुच्या अंकित जीव झाला । त्याचा असे भार निरंजनाला ॥
नारायणाचा भ्रम दूर केला । विसरूं कसा० ॥ ९ ॥

# आरती

## ( १ )

( श्रीएकनाथ महाराजकृत )

त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ॥
नेती नेती शब्दें न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥ १ ॥

जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।
आरति ओंवाळीतां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त । अभाग्यासी कैंचा कळेल ही मात ॥
पराही परतली तेथें कैंचा हा हेत । जन्म-मरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥
जयदेव जयदेव०
दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान । हारपलें मन झालें उन्मन ॥
मी-तूं-पणाची झाली बोळवण । एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ ३ ॥
जयदेव जयदेव०

श्रीसद्गुरु वासुदेवानंद सरस्वती ( टेंब्येस्वामी ) कृत.

[ चाल : सुंदर मुख तुंदिल तनु० ]

नीराजन आवाळिन अत्रिकुमरा। भयभंजन मनरंजन जय दिगंबरा ॥
॥ ध्रु ॥

भयमार्जन नयदर्शन तूं कृपा करा। भयतर्जन अघभर्जन पाहिमां हरा। पिशुनार्दन रिपुमर्दन अभयवरकरा। दत्ता-मत्ता-चित्ता। भवहरणीं, तवचरणीं, ध्रुव करुनी, ठेवि सुखकरा ॥ १ ॥

कृष्णातटिं रम्यमठीं वसतिसुंदरा। जे संकटिं वाहति मिठि घेसि त्यां वरा। मी हिंपुटि आलों पोटिं भिउनि संसारा। मूर्खा-रंका-त्या कां, पाहसिना, वाहसिना, धावसिना, सकल मलहरा ॥ २ ॥

दत्त सदा मत्त मदा हरुनि रक्षितो। व्यक्तमदा अव्यक्तपदा सतत-दाविती। भक्तपदासक्त सदा वासुदेव तो। तरि कां-सुमुखां-न सुखा, पावतसे, कां हो असे, ह्मावें कसें, बोल सुखकरा ॥ ३ ॥

( ३ )

जय जय दत्तराजयोगी। जयजय महाराजयोगी ॥ धृ ॥

सेली शृंगी कंथा झोली। विभूत लगाया तनमो। कोटि चंद्रमा तेज झुलत है। चलो आपने गतमो ॥ १ ॥

शंख चक्र और त्रिशुल विराजे। गले वडी वनमाला। जोगदंड अवधूत दिगंबर बनारस रहनेवाला ॥ २ ॥

कृपा करो हम दीन रंक है। ले जाव आपनी माया। महादेवसुत ध्यान धरत है। जब तब हो दर्शन पाया ॥ ३ ॥


# भजन

नारायण गुरु अत्रीनाथ। दत्त जनार्दन एकनाथ ॥ १ ॥

दिगंबरा दिगंबरा। श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥ १ ॥

गुरु महाराज गुरु। जयजय परब्रह्म सद्गुरु ॥ १ ॥

श्रीसद्गुरुमहाराजकी जय !



श्री गुरुदेव दत्त